MAH/MUL/0303[illegible]
ISSN-23[illegible]

# विद्यावार्ता

Issue-53, Vol-15, Jan. To March 2025

Peer Reviewed International Multilingual Research Journal




Editor

Dr. Bapu G. Gholap

Scanned with CamScanner

MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

# विद्यावार्ता™

Jan. To March 2025
Issue 53, Vol-15

Date of Publication
01 March 2025

**Editor**

**Dr. Bapu g. Gholap**

(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

**विद्येविना मति गेली, मतीविना नीति गेली**
**नीतिविना गति गेली, गतिविना वित्त गेले**
**वित्तविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले**
**-महात्मा ज्योतीराव फुले**

❖ **विद्यावार्ता** या आंतरविद्याशाखीय बहूभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. **न्यायक्षेत्र:बीड**

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

Harshwardhan Publication Pvt.Ltd.

At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed

Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295

harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

Scanned with CamScanner

# Editorial Board & review Committee


- Chief Editor
Dr Gholap Bapu Ganpat
Parli_Vaijnath,Dist. Beed Pin-431515 (Maharashtra)
9850203295, 7588057695
vidyawarta@gmail.com

- **Dr. Namita Mittal**
Assistant Professor Grade (Guest), Computer Science
Central Sanskrit University, Jaipur Campus, Jaipur
Triveni Nagar, Gopalpura bypass road, Jaipur
Pin 302018Mob.No. 9413444921

- **Dr. Momin Mujtaba**
Faculty Member,Dept. of Business Admin.
Prince Salman Bin AbdulAziz University
Ministry of Higher Education,Kingdom of Saudi Arabia, Tel No.: +966-17862370 Extn: 1122

- **N.Nagendrakumar**
115/478, Campus road,
Konesapuri, Nilaveli ( Postal code-31010),
Trincomalee, Sri Lanka
nagendrakumarn@esn.ac.lk

- **Dr. Vikas Sudam Padalkar**
vikaspadalkar@gmail.com
**Cell.** +91 98908 13228 (India),
+ 81 90969 83228 (Japan)

- **Dr. Wankhede Umakant**
Navgan College, Parli –v Dist. Beed
Pin 431126 Maharashtra
Mobi.9421336952
umakantwankhede@rediffmail.com

- **Dr. Basantani Vinita**
B-2/8, Sukhwani Paradise,
Behind Hotel Ganesh, Pimpri,
Pune-17 Cell: 09405429484,

- **Dr. Bharat Upadhya**
Post.Warnanagar, Tq.Panhala,
Dist.Kolhapur-4316113
Mobi.7588266926

- **Jubraj Khamari**
AT/PO - Sarkanda, P.S./Block - Sohela
Via/Dist. - Bargarh, Pin - 768028 (Orissa)
Mob. No. – 09827983437

- **MISS. VARSHA ANILRAO TIDKE**
FULE-AMBEDKAR COLLEGE OF SOCIAL WORK,
HANUMAN NAGAR, REVENUE COLONY, GADCHIROLI
9421857700
varshaatidke21@gmail.com

- **Dr Trushna S Kalambe**
66 Ayodhyanagar behind
sai Mandir lane no 2 Nagpur-440024

- **Dr. Ambhore Shankar**
Jalna,Maharashtra
shankar296@gmail.com
Mobi.9422215556

- **Dr. Sumit Prasad**
Professor Colony, Kankarbagh,
PO – Lohia Nagar,Patna – 800 020 (Bihar)
prasadsumit78@gmail.com

- **Prof. Surwade Yogesh p**
Dept. Of Library, Dr B A M U Aurangabad , Pin 431004
**Cell No:** +919860768499
yogeshps85@gmail.com

- **Dr.Deepak Vishwasrao Patil,**
At.Post.Saundhane, Near
Kalavishwa Computer, Tq.Dist.Dhule-424002.
Mobi. 9923811609
patildipak22583@gmail.com

- **Dr.Vidhya.M.Patwari**
Vanshree Nagar,Behind Hotel
Dawat, Mantha Road, Jalna-431203
Mobi.9422479302
**patwarivm@rediffmail.com**

- **Dr. Varma Anju**
Assistant Professor, Dept. of Education,
Sikkim University 6th Mile, Samdur Tadong-737102
GANGTOK - Sikkim, (M.8001605914)
anjuverma2009@rediffmail.com

- **Dr. Dinesh Kumar Charan**
Associate Professor and HOD-History Dept.,
Govt.Lohia College Churu (Rajasthan) India
Pin- 331001
**Mob. No.-9414305804**




Scanned with CamScanner

# INDEX

01) Cybercrime: A Threat to Society
Deepika Joshi, Udaipur || 10

02) A study on the importance of mutual funds as an investment tool
Dr. Dhanu Kumar, East Champaran || 11

03) ACID ATTACKS ON WOMEN: LEGISLATIVE AND LEGAL RESPONSES IN INDIA
Dr. Gaurav Kaushik, Agra || 16

04) ROLE OF MILLETS IN EMPOWERING THE EARNINGS OF MARGINAL FARMERS....
Dr. H. R. Kaushal, Almora, Uttarakhand || 24

05) Combining Vedic agricultural practices with Modern Agriculture to....
Miss. Laxmi Manral, Chudiyala, Haridwar || 32

06) WHITE COLLAR CRIME AND ITS IMPACT ON INDIAN SOCIETY
Dr. Mohd Ashraf Ali, Aligarh (U.P.) || 37

07) INNOVATIONS IN TEACHING, LEARNING AND EVALUATION
Dr. Mrs. Mrunali N. Deshpande, Amgaon, Dist-Gondia || 41

08) A STUDY ON THE EFFECT OF COMPENSATION AND REWARD SYSTEM....
Neha Kumari, Bhagalpur, Bihar || 44

09) THE IMPACT OF THE CASTE SYSTEM IN INDIAN DEMOCRACY : SOCIAL....
NIKHIL RAMAN TANTI, Hyderabad || 49

10) EDUCATION IN THE POST COVID ERA
DR. SHIVANI, Sonipat || 57

11) Work Stress, Job Satisfaction, and Its Effect on Productivity Among....
Subhra Upadhyay, Vasant K. Bhosle, Parbhani || 60

12) Green Accounting in India: Opportunities, Challenges, and Implications....
DR. SACHIN GOYAL, ASHWANI PEMAWAT, Chhatarpur || 63

13) A Study of Socio-Economic Conditions of Industrial Workers (With special....
Dr. Ashok Kumar Maurya, Dr. Sunil Kumar Maurya, Rudrapur (U.S. Nagar) || 69

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com



Scanned with CamScanner

14) ग्रामीण भागातील बदलती जीवनशैली : एक समाजशास्त्रीय अभ्यास
प्रा. बाळासाहेब नामदेवराव भांडवलकर, पिंपळनेर (ग.) ता. जि. बीड ||77

15) आधुनिकतेच्या प्रभावामुळे पारंपारिक कुटुंब व्यवस्थेतील बदल
प्रा. बी. एन. भांडवलकर, पिंपळनेर (ग.) ता. जि. बीड ||79

16) भारतीय ज्ञान प्रणालीचा सामाजिक व शैक्षणिक दृष्टिकोनातून अभ्यास
प्रा. चामे हरिश्चंद्र व्यंकटराव, कोल्हापूर ||82

17) माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या भौगोलिक संकल्पनांच्या आकलनासाठी....
डॉ. वंदना सतीश चौधरी, जळगाव ||87

18) बौद्ध तत्वज्ञानात चार स्मृती प्रस्थानांचे महत्त्व
कविता वासुदेव दवंडे, डॉ. विनोद श्रीराम जाधव, औरंगाबाद ||91

19) भारतीय आरमाराचे जनक : छत्रपती शिवाजी महाराज
प्रा. हितेश वसंत फिरके, पाल ता. रावेर जि. जळगाव ||95

20) सदानंद देशमुख यांच्या 'गोठा' या कथासंग्रहाचे विश्लेषणात्मक अध्ययन
प्रा. डॉ. मंगल पांडुरंग खेडेकर, रिसोड जिल्हा वाशिम ||97

21) अमरावती विभागातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांचे उत्पादन संदर्भात....
कैलास दगडू मसुरकर, प्राचार्य डॉ. एल. के. करांगळे, मंगरुळपिर ||101

22) भारतीय संघ राज्य : काश्मीर एक ऐतिहासिक दृष्टीक्षेप
गंगणे आर.व्ही., केज ||105

23) राजे छत्रपती शिवाजी महाराजांचा वैज्ञानिक दृष्टिकोन
प्रा. के. एम. कांबळे, प्रा.डॉ. थोरवे यु.जी., जालना ||108

24) विज्ञापन और समाज
डॉ. गजानन हरिराम बने, लातूर ||110

25) मध्य प्रदेश के ग्रामीण क्षेत्रों में कृषि प्रथाओं का पर्यावरणीय और आर्थिक प्रभाव
CA. Manish Bhagat, Dr Sachin Goyal, Panna (M.P.) ||112

26) नारी दृष्टि और अजय शर्मा के उपन्यास
डॉ. कंचन, चंडीगढ़ ||121

http://www.printingarea.blogspot.com/03 www.vidyawarta.com



Scanned with CamScanner

16

# भारतीय ज्ञान प्रणालीचा सामाजिक व शैक्षणिक दृष्टिकोनातून अभ्यास

प्रा. चामे हरिश्चंद्र व्यंकटराव
समाजशास्त्र विभाग प्रमुख
विवेकानंद महाविद्यालय
{अधिकार प्रदत्त स्वायत्त संस्था}, कोल्हापूर

**********

**प्रस्तावणा :—**

भारतीय समाजाला अनेक वर्षाची ऐतिहासिक परंपरा लाभलेले आहे. भारतीय समाजात अनेक प्रथा, परंपरा, ज्यावर समाजाच अस्तित्व टिकून होतं त्या जिवंत राहिल्या पाहिजेत. भारतीय समाजाचा सांस्कृतिक वारसा जिवंत राहिला पाहिजे, भारतीय समाजाने जगाला एक वेगळं ज्ञान दिल आहे. ही पारंपारिक ज्ञानाची शिदोरी पुढच्या पिढीने आत्मसात करणे गरजेचे आहे. भारतीय ज्ञान प्रणालीच्या माध्यमातून भारतीय समाजातील पारंपारिक ज्ञान एका पिढीकडून दुसऱ्या पिढी कडे हस्तांतरित झाले पाहिजे त्यासाठी भारतीय ज्ञान प्रणाली महत्त्वपूर्ण आहे. बदलत्या सामाजिक जीवनात शिक्षण व्यवस्थेमध्ये मोठ्या प्रमाणात परिवर्तन झाले आहे या शिक्षण व्यवस्थेमध्ये तत्त्वज्ञान आरोग्य वैदिक, साहित्य, वेद यासारख्या भारतीय संस्कृतीचा जो पारंपारिक वारसा आहे तो वारसा बदलत्या शैक्षणिक दृष्टिकोनातून मागे पडतो काय अशी भीती निर्माण झाली आहे. विद्यार्थ्यांना आपल्या देशाची ऐतिहासिक पार्श्वभूमी समजून घेण्यासाठी भारतीय ज्ञान प्रणालीची भूमिका महत्वपूर्ण आहे. वैदिक साहित्य, उपनिषदे, वेद भारतीय ज्ञान प्रणालीचा पाया तयार झालाआहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण NEP-- २०२० या शैक्षणिक धोरणात भारतीय ज्ञान आणि तत्त्वज्ञानाच्या समृद्ध वारसाचा मार्गदर्शक आधार म्हणून भारतीय ज्ञान प्रणालीचा स्वीकार करण्यात आला. भारतीय ज्ञान विज्ञान आणि जीवनदर्शन ज्ञान प्रणाली अनुभव निरीक्षण प्रयोग आणि सखोल विश्लेषणातून विकसित झाली आहे. या भारतीय ज्ञान प्रणालीने आपले शिक्षण, कला, प्रशासन, कायदा, न्याय आरोग्य उत्पादन आणि वाणिज्य या सर्व सर्वांना प्रमाणित करण्याचा आणि प्रत्यक्षात आणण्याचा या या प्रणालीने प्रयत्न केला आहे याचा परिणाम भारताच्या शास्त्रीय आणि इतर भाषावर झाला आहे .ज्या सर्जनशील मौखिकानी साहित्यिक परंपरा द्वारे पुढे आले आहेत. त्यात प्राचीन भारताचे ज्ञान त्याच्या कामगिरी आणि अडचणी तसेच पर्यावरण शास्त्र आरोग्य शिक्षण आणि अस्तित्वाच्या प्रत्येक पैलू बद्दल भारतीय भविष्यातील उद्दिष्टाची समज या प्रणालीमध्ये समाविष्ट आहे. भारतीय ज्ञान प्रणाली ही शिक्षण मंत्रालयाच्या अंतर्गत एआयसीटीई नवी दिल्ली येथे एक नाविन्यपूर्ण कक्ष आहेत भारतीय ज्ञान प्रणालीच्या सर्व पैलू वर आंतरविद्याशाखीय संशोधनाला प्रोत्साहन देण्यासाठी पुढील संशोधन आणि सामाजिक अनुपयोगासाठी भारतीय ज्ञान प्रणालीचे जतन आणि प्रसार करण्यासाठी ही संस्था स्थापन करण्यात आली आहे कला आणि साहित्य कृषी मूलभूत विज्ञान अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान वास्तुकला व्यवस्थापन अर्थशास्त्र इत्यादी क्षेत्रात आपल्या देशाचा समृद्ध वारसा आहे. आणि पारंपारिक ज्ञानाचा प्रसार करण्यासाठी ही प्रणाली सक्रिय सहभागी होईल. भारतीय ज्ञान प्रणाली सध्याच्या सामाजिक समस्यांना तोंड देण्यासाठी समग्र आरोग्य, मानसशास्त्र, युरो सायन्स, निसर्ग पर्यावरण आणि शाश्वत विकास यासारख्या अनेक क्षेत्रांमध्ये अधिक अभ्यासाला प्रोत्साहन आणि सक्षम करण्याचा प्रयत्न करते. भूतकाळातून शिकण्याची आणि भारतीय ज्ञान प्रणालीचे एकत्रीकरण करण्याचा मुख्य उद्दिष्ट या भारतीय ज्ञान प्रणालीचे आहे. प्राचीन ज्ञान प्रणालीचा वापर करणे. ज्या ज्ञान हस्तांतरणाची अखंड परंपरा आणि विशेष दृष्टिकोनाने वैशिष्ट्य कृत आहेत. भारत आणि जगातील वर्तमान आणि उद्योग समस्या सोडविणे हे या प्रणालीचे महत्वपूर्ण उद्दिष्ट आहे. भारतीय ज्ञान प्रणाली एक ज्ञानाचा मोठा साठा आहे हा साठा खूप गुंतागुंतीचा आहे .यास अनेक वर्षाचा वारसा लाभलेला आहे. सामाजिक सांस्कृतिक, आरोग्य, विविध संस्था व्यक्तीचे जीवनमान, बदलते सामाजिक आर्थिक

संबंध, कुटुंब, धर्म आरोग्यासाठी महत्त्वपूर्ण असणारे प्राचीन ज्ञान अशा बाबींना महत्त्वाचे स्थान आहे.

**संशोधन पद्धती :—**

प्रस्तुत संशोधनासाठी द्वितीय तथ्य संकलनाचा वापर करण्यात आलेला आहे .त्यासाठी संदर्भ ग्रंथ, मासिके, वर्तमानपत्रे, इंटरनेट, यासारख्या दुय्यम स्रोतांचा वापर करण्यात आला आहे.

**संशोधनाचे उदिष्ट्ये :—**

१) भारतीय ज्ञान प्रणालीचे शैक्षणिक दृष्टिकोनातून अभ्यास करणे.

२) भारतीय ज्ञान प्रणालीचे सामाजिक दृष्टिकोनातून अभ्यास करणे.

३) भारतीय ज्ञान प्रणालीतील वेगवेगळे अभ्यास विषयक दृष्टिकोन अभ्यासणे.

४) भारतीय ज्ञान प्रणालीचे ऐतिहासिक महत्त्व अभ्यासने.

**संशोधनाचे गृहीतके :—**

१) भारतीय ज्ञान प्रणाली मुळे संस्कृतीचे जतन होईल.

२) भारतीय ज्ञान प्रणाली मुळे आध्यात्मिकतेच्या विकासासाठी उपयोग होईल.

३) शिक्षणाला नैतिकतेची जोड मिळेल.

४) भारतीय समाजाचा पारंपरिक वारसा जपला जाईल.

**भारतीय ज्ञान प्रणाली समाज व शिक्षण :—**

भारतीय ज्ञान प्रणाली आपला ऐतिहासिक वारसा जपण्यासाठी खूप महत्त्वाची असून या भारतीय ज्ञान प्रणालीमुळे आपल्या सांस्कृतिक वारशाचे जतन होईल आणि जगासाठी एक आदर्श सांस्कृतिक वारसा मिळेल .शैक्षणिक दृष्टिकोनातून जर विचार केलं बदलत्या आधुनिक काळामध्ये मोठ्या प्रमाणात परिवर्तन होत आहे.आपल्या पारंपारिक ज्ञान कुठेतरी मागे पडत आहे. जे व्यक्तीसाठी समाजासाठी देशासाठी जगासाठी आवश्यक असणारे महत्त्वपूर्ण आध्यतिमकतेचा साठा प्राचीन काळापासून भारतीय संस्कृतीमध्ये दडलेला आहे. या ज्ञानाच्या साठ्याचे जतन करणे त्याचा विकास करणे समाजाला याचा उपयोग व्हावा या दृष्टिकोनातून त्याचा प्रचार आणि प्रसार करणे हे महत्त्वाचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून शासनाने NEP २०२० या नवीन शैक्षणिक धोरणामध्ये भारतीय ज्ञान प्रणालीचा समावेश करून येणाऱ्या पिढीसाठी भारताची प्राचीन परंपरा जे आहेत त्या परंपराची चे जतन करणे आणि प्रसार करणे यासाठी प्रोत्साहन देणारे ठरले आहे. भारतीय संस्कृती आपण सर्व एक आहोत असा महान संदेश देणारी केवळ मानवालाच नाही तर प्रत्येक सजीवाला महत्त्वाचे स्थान देणारी अशी ही भारतीय संस्कृती प्राचीन भारतीय ज्ञान ही मानवाच्या सर्वात जुन्या आणि समृद्ध परंपरांपैकी एक आहे .वेळेत उपनिषदे पुराणे आणि इतर ग्रंथातून विज्ञान, तत्त्वज्ञान गणित आयुर्वेद योग यासारख्या अनेक विषयाचे सखोल ज्ञान मांडलेले आहे आर्यभट्ट चरक पतंजली यासारख्या विद्वानाने विश्वाला महत्त्वपूर्ण योगदान दिले, भारताच्या या ज्ञानाची विशेषता म्हणजे त्याचे आध्यात्मिक आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाने समाजाच्या सर्व अंगानं स्पर्श करणारे विचार प्राचीन भारतीय शिक्षण पद्धतीने समग्र मानव विकासावर भर दिला आहे आजही या ज्ञानाचा वापर आधुनिक काळात प्रेरणा व मार्गदर्शक म्हणून केला जात आहे. या महान संस्कृतीला प्राथमिक स्वरूपात का होईना जाणून घेण्यास मदत करणे हा या घटकाचा उद्देश आहे.

**भारतीय ज्ञान प्रणाली शिक्षण आणि समाज:—**

भारती ज्ञान प्रणाली हे जगात सर्वात प्राचीन अशी ज्ञान परंपरांपैकी एक मानली जाते या प्रणालीत मानवाच्या सर्वांगीण विकासाला महत्त्व देण्यात आले आहे वेद.

उपनिषदे, धर्मशास्त्र, आयुर्वेद, योग वास्तुशास्त्र आणि नाट्यशास्त्र या शाखांमध्ये ज्ञानाचे विविध पैलू स्पष्टपणे मांडलेले आहेत.

भारतीय ज्ञान प्रणाली केवळ बौद्धिक आणि वैज्ञानिक क्षेत्रांमध्येच महत्त्वाची नाहीतर ती नैतिक समाजशास्त्राने सामाजिक सांस्कृतिक मूल्यानाही समान महत्त्व देते. भारती ज्ञान प्रणालीचा गाभा म्हणजे विज्ञान आणि अध्यात्मयाचा समन्वय प्राचीन काळात विज्ञान गणित खगोलशास्त्र औषधशास्त्र यासारख्या शास्त्राचा विकासात भारतीय विधानाने मोलाचे योगदान दिले आहे. उदाहरणार्थ आर्यभट्ट आणि खगोलशास्त्रात केलेले



Scanned with CamScanner

कार्य आणि चारक आणि सुश्रुत यांनी आयुर्वेदातील आरोग्य शास्त्राच्या माध्यमातून दिलेले योगदान आजही विसरता येत नाही. या प्रणालीत योगाने ध्यान याच्या माध्यमातून शारीरिक मानसिक आरोग्याचा समतोल राखण्यावर भर दिला जातो या प्रणालीमुळे मानव जातीला सर्वांगीण विकासाचा मार्ग दाखवला आहे. ज्यात शारीरिक, मानसिक, सामाजिक आणि अध्यात्मिक विकास यावर विशेषता भर दिला जातो. भारतीय परंपरेमध्ये ज्ञानाचे वर्गीकरण अपरा विद्या आणि परा विद्या असे केले जाते.

अपरा विद्या— अपरा विद्या म्हणजे लौकिक विद्या यामध्ये वेद विज्ञान गणित तर्कशास्त्र व्याकरण आणि इतर भौतिकशास्त्राचा समावेश या विद्येमध्ये होतो हे ज्ञान जीवन जगण्यासाठी आवश्यक असलेले परंतु अंतिम सत्तेच्या शोधासाठी अपूर्ण मानले जाते अपरा विद्या जीवनाच्या व्यावहारिक अंगांना समजून घेण्यास मदत करते परंतु आत्म्याचे सत्य समजून घेण्यासाठी पुरेशी नाही अशी तत्त्वज्ञान सांगते.

परा विद्या :— परा विद्या म्हणजे अध्यात्मिक ज्ञान हे ज्ञान आत्म्याशी संबंधित असते त्याद्वारे अंतिम सत्य आत्मज्ञान आणि ब्रह्मज्ञान प्राप्त होते. परा विद्या मनुष्याच्या अस्तित्वाचा अंतिम उद्देश शोधण्याचा मार्ग आहे या ज्ञानाद्वारे व्यक्ती जीवनाच्या अंतिम सत्तेचा शोध घेते आणि मोक्ष किंवा आत्मसाक्षात्कार साध्य करण्याचा प्रयत्न करते उपनिषदामध्ये याचे वर्णन ब्रह्म विद्या असे केले जाते यामध्ये आत्म्याचे परमेश्वराचे आणि जीवन मरणाच्या चक्राचे गूढ उकलले आहे. भारतीय ज्ञान परंपरेचे स्वरूप तत्त्वज्ञानिक अध्यात्मिक आणि व्यवहारिक अशा सर्व स्तरात पसरलेले आहे

शैक्षणिक जीवन:— भारतीय ज्ञान परंपरा गुरुकुल पद्धती :— वेदकाळालीन काळात गुरुकुल पद्धतीत शैक्षणिक प्रणाली म्हणून अस्तित्वात होती विद्यार्थी गुरुकडे जाऊन शिक्षण घेत प्राचीन शिक्षणाचा उद्देश शिष्यांचा सर्वांगीण विकास हा होता त्यांची ज्ञानज्योती प्रबुद्ध करणे ती अधिक प्रखर बनविणे आणि त्याचा जीवनाला सर्वार्थाने प्रभावशाली बनविणे हे प्रमुख ध्येय होते वेदानिया उद्देश प्राप्तीसाठी तप म्हणजे कठोर शिस्तांनी दीक्षा म्हणजे आत्मसर्पण ही दोन साधने सांगितलेली आहेत शिवाय संयम आणि चरित्र या दोघांना जास्त महत्त्व दिले जाते

विषय — अर्थवेद गोफत ब्राह्मण आणि उपनिषद यामध्ये विद्याचा उल्लेख आहे मधील सूची सर्वात मोठी आहे. त्यानुसार विषय पुढीलप्रमाणे वेद, पुराण, वेदांत, पित्रविद्या, तत्त्वज्ञान ,राशीविद्या, अर्थात गणित, विधी विद्या अर्थात खनिजशास्त्र, वाकोवाक्य, एकायन, ब्रह्मविद्या भूत विद्या नक्षत्र विद्या ज्योतिष्य आणि क्षत्र विद्या. सर्प विद्या. देव विद्या. देवजन विद्या. यासारख्या वेगवेगळ्या विषयाचा समावेश शिक्षणात केला जात असे.

**धार्मिक ग्रंथ आणि साहित्य :—**

वेद वेद हे समाजातील धार्मिकांनी सांस्कृतिक जीवनाचे प्रमुख आधारस्तंभ होते. ऋग्वेद साम्यवेद यजुर्वेद आणि अर्थवेद हे चार वेद धार्मिक ज्ञानाचे स्रोत होते.

उपनिषदे :— वेदाचा गुढार्थ आणि तत्त्वज्ञान यावर आधारित उपनिषदांनी वेदकालीन जीवनावर प्रभाव टाकला उपनिषदा मध्ये आत्मा ब्रह्म, मोक्ष आणि कर्म यावर चर्चा करण्यात आली आहे

भारतीय ज्ञान प्रणाली विविधतेने नटलेली आहे ती जगातील विविध अंगणात स्पर्श करणारी आहे ज्यामध्ये शारीरिक मानसिक बौद्धिक नैतिक आणि आध्यात्मिक प्रगतीचा समावेश आहे या प्रणालीचे स्वरूप वेगवेगळ्या शाखेमध्ये विभागलेले आहे :—

वेद व तत्त्वज्ञान:— भारतीय ज्ञानाचे मूळ वेदामध्ये आढळते. वेद उपनिषदे आणि तत्त्वज्ञानाच्या ग्रंथांमध्ये सृष्टी, आत्मा, परमात्मा या विषयी गहण विचार मांडलेले दिसून येतात. यासारख्या तत्त्वज्ञानाच्या शाळांनी मानवी अस्तित्वाबद्दल ही दृष्टिकोन दिले आहेत या दृष्टिकोनाच्या अभ्यासावर ही भारतीय ज्ञान प्रणाली लक्ष देते.

वास्तुशास्त्र आणि ज्योतिष्य:— भारतात वास्तुशास्त्र आणि ज्योतिषी हे जीवनशैलीशी निगडित विज्ञान आहे. वास्तुशास्त्रात पर्यावरणाशी संतुलन राखून वास्तू बांधण्याचे तत्त्वज्ञान आहे तर ज्योतिष्य जीवनातील घटना चे ग्रहण नक्षत्राशी असलेले संबंध स्पष्ट करते आज अनेक वर्ष झालेले असले तरी ज्योतिष्यशास्त्रावरील विश्वास जो आज सर्वसामान्य लोकांचा आहे तो कायम असाच राहावा आणि आपली

ज्योतिषी शास्त्र गृह नक्षत्र याविषयी जे भविष्यवाणी करते ती खरी ठरते म्हणून या ज्योतिषशास्त्राचे महत्त्व आजही नाकारता येत नाही.

**कला आणि साहित्य :—**

भारतीय ज्ञान प्रणालीमध्ये काव्य शास्त्र, नाट्यशास्त्र, संगीत यासारखे महत्त्वपूर्ण विषयाचा समावेश आहे, भारतीय कला मध्ये नाटक संगीत नृत्य यांचा समावेश असून त्यांच्यात सौंदर्याने तात्विक विचाराचे प्रतिबेम दिसून येते व भारतीय संस्कृतीची प्रतिमा या वेगवेगळ्या कलेमधून प्रतिबिंबित होत असल्याचे दिसते.

आयुर्वेद आणि योग :— भारतीय समाजामध्ये अनेक शोध लागले नवीन नवीन औषधाची निर्मिती झाली पण भारतीय आरोग्य शास्त्रातील आयुर्वेदाने योग या दोन महत्त्वाच्या प्रणालीचे महत्त्व आजही डावलता येत नाही. शारीरिक मानसिक आरोग्याचा समतोल साधण्यासाठी हे आयुर्वेद आणि योग प्रणाली मार्गदर्शक ठरते हे सत्य नाकारता येत नाही. आयुर्वेद शारीरिक उपचारावर भर देतो तर योग मानसिक शांती आणि शारीरिक फिटनेस वाढवणे यावर भर देतो . जगात कितीही परिवर्तन झाले कितीही प्रगती झाली तरी जुनं ते सोनं म्हटल्याप्रमाणे आयुर्वेदाचे महत्त्व आज नाकारता येत नाही . पुन्हा आयुर्वेदाकडे चला ही म्हणण्याची वेळ आली आहे.

गणित आणि खगोलशास्त्र:— प्राचीन भारतातील अनेक विद्वानांनी आपल्या बुद्धी क्षमतेच्या आधारावर गणित आणि खगोलशास्त्रात महत्वपूर्ण शोध लावलेत त्यात शून्याचा शोध त्रिकोणमिती भूमिती याचे अध्ययन भारतीय गणित परंपरेचा भाग आहे आर्यभट शंकराचार्य यासारख्या गणित तज्ञांनी खगोलशास्त्राची जी मोठी प्रगती केली आहे या प्रगतीचा आढावा या भारतीय ज्ञान प्रणालीमध्ये घेतला जातो.

**नीतिशास्त्र आणि समाजशास्त्र :—**

नीतिशास्त्र आणि समाजशास्त्राच्या माध्यमातून भारतीय समाजातील सांस्कृतिक नैतिकता धर्म कर्तव्य आणि समाजातील माणसाचे स्थान या विषयावर विचार केला गेला आहे धर्मशास्त्र स्मृतीग्रंथ आणि विविध निती ग्रंथ यातून समाज व्यवस्थेचे तत्त्वज्ञान मांडलेलं आहे. धर्म जात प्रथा परंपरा सामाजिक संबंध लोकांचे वर्तन नैतिकता सामाजिक नियमाने प्रथा परंपरा यासारख्या विषयांना महत्त्वाचे स्थान आहे.

तत्त्वज्ञान आणि आध्यात्मिकता :— भारतीय ज्ञान प्रणालीमध्ये आत्मा ब्रह्मा आणि विष्णू याच्याबद्दल सखोर विचार मांडलेले आहे उपनिषद वेद भगवत गीता आणि अन्य तत्त्वज्ञान घनता मधून जीवनाचे ध्येय मोक्ष कर्म आणि पुनर्जन्म यावर मार्गदर्शन केलेले आहे अद्वैत, द्वैत सांख्य , योग अशा विविध तत्त्वज्ञान शाखा भारतीय ज्ञान प्रणालीच्या अंगभूत घटक आहेत.

शिक्षण आणि समाज सुधारणा:— प्राचीन भारतीय विद्यापीठे जसे की नालंदाज, तक्षशिला विक्रमशीला इत्यादी शास्त्र तत्त्वज्ञान कला आणि विज्ञान या सर्व क्षेत्रांमध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे या योगदानाचे महत्त्व जाणून घेणे व समाज सुधारणा आणि शिक्षणाचा प्रसार हा भारतीय ज्ञान प्रणालीचा एक महत्त्वपूर्ण भाग आहे.

**भारतीय ज्ञान प्रणालीची आवश्यकता:—**

आजच्या या आधुनिक ताण—तणावग्रस्त आणि भौतिकवादी जीवनामध्ये भारतीय ज्ञान प्रणाली याची भूमिका महत्त्वाची ठरते भारतीय ज्ञान प्रणाली ही फक्त वैज्ञानिक व भौतिक प्रगतीवरच भर देत नाही तर ती मानसिक शारीरिक नैतिक आणि अध्यात्मिक उंदीर उन्नतीवर ही भर देते त्यामुळे आजच्या या गुंतागुंतीच्या तणावपूर्ण समाज व्यवस्थेमध्ये भारतीय ज्ञान प्रणालीचे अतिशय महत्त्वपूर्ण आहे.

मानसिक आणि शारीरिक स्वास्थ:— आजच्या आधुनिक जीवनामध्ये लोक चिंता मानसिक ताण शारीरिक समस्यांना समोर जात आहेत यासाठी योग ध्यान आणि आयुर्वेद यासारख्या भारतीय ज्ञान प्रणालीमुळे लोकांमध्ये मानसिक शांती आणि शारीरिक तंदुरुस्ती मिळवणे शक्य होणार आहे आयुर्वेदातील नैसर्गिक उपाय आणि योगाच्या साधनांमुळे व्यक्तीचा आरोग्य सुधारण्यात आणि चांगलं राहण्यात महत्त्वपूर्ण योगदान असणार आहे.

सर्व समावेशक शिक्षण:— भारतीय ज्ञान प्रणाली फक्त विशेष क्षेत्रापुरती मर्यादित नाही तर जीवनाच्या सर्व पैलूवर विचार करते शिक्षणाचा सर्वांगिण विकासासाठी ही प्रणाली उपयुक्त ठरणार आहे. व्यक्तीच्या शारीरिक



Scanned with CamScanner

मानसिक बौद्धिक आणि अध्यात्मिक प्रगतीसाठी ही शिक्षण प्रणाली महत्त्वपूर्ण ठरते. त्यामुळे या शिक्षण प्रणालीचा जर विचार केला तर फक्त विशिष्ट घटकावरच भर न देता मानवाच्या सर्वांगीण विकासालावर भर देणारी ही शिक्षण प्रणाली मानवासाठी उपयुक्त ठरणार आहे.

अध्यात्मिक उन्नती :— आजच्या या भौतिक विश्वामध्ये भौतिक सुखाला महत्त्व देण्याची मानसिकता आज वाढलेली असली तरी जीवनातील आनंद समाधान आणि शांती याचा शोध माणूस सातत्याने घेत असतो भारतीय ज्ञान परंपरा आत्मज्ञान मोक्ष आणि ध्यान यासारख्या संकल्पना मधून आध्यात्मिक उन्नतीचे मार्ग दाखवते या तत्त्वज्ञानामुळे मानवाच्या जीवनाला एक ध्येय व उद्दिष्ट प्राप्त होते त्यासाठी ही प्रणाली अतिशय महत्त्वपूर्ण आहे

शाश्वत विकास :— ही ज्ञान प्रणाली समाजाच्या शाश्वत विकासावर भर देते आधुनिक समाजात भौतिक विकासावर भर दिला जात असला तरी तो कायम स्वरूपाचा नाही समाजाचा विकास जर करायचा असेल तर समाजाचा शाश्वत विकास करणे गरजेचे आहे. त्यामुळे भारतीय तत्त्वज्ञानात शाश्वत विकासाचे मार्गदर्शन करण्याचं काम या ज्ञान प्रणालीने करणार आहे जिथे संसाधनाचा विवेकपूर्ण वापर मानवाने निसर्गाशी संतुलन राखणे यासाठी ही ज्ञान प्रणाली महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

सामाजिक नैतिक मूल्यशिक्षण :—आधुनिक काळामध्ये माणूस भौतिक सुखाच्या पाठीमागे लागलेला आहे त्यामुळे अध्यात्मिक समाधान किंवा नैतिक मूल्य कुठेतरी मागे पडत आहेत जोपर्यंत विकासाला नैतिक मूल्याची जोड मिळणार नाही तोपर्यंत समाजामध्ये शांती आणि समाधान दिसणार नाही त्यासाठी फक्त भौतिक प्रगती करून चालणार नाही तर या भौतिक प्रगतीला नैतिकतेची जोड देणे गरजेचे आहे त्यामुळे समाजात शिस्त ,शांती श्जगा आणि जगू द्याश ही मानवी मूल्याची रुजवण्यात ही ज्ञान प्रणाली उपयुक्त ठरणार आहे.

**निष्कर्ष :—**

१) भारतीय ज्ञान प्रणाली प्राचीन व व्यापक आणि सर्वसमावेशक दृष्टिकोन असणारे प्रणाली आहे.

२) जीवनाच्या प्रत्येक अंगाचा समतोल विचार करणारे ही प्रणाली शारीरिक, मानसिक, सामाजिक, नैतिक आणि अध्यात्मिक उन्नतीसाठी मार्गदर्शन ठरते.

३) या प्रणालीत शाश्वती विकासाला महत्त्वाचे स्थान आहे.

४) व्यक्तीचा नैतिक व आध्यात्मिक विकास करण्यासाठी ही प्रणाली उपयुक्त ठरणार आहे.

५)भारतीय ज्ञान प्रणालीमुळे भारतीय समाजाचा सांस्कृतिक वारसा एका पिढी कडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरीत होईल.

६)आधुनिक व गुंतागुंतीच्या समाज व्यवस्थेत निर्माण होणारा ताण तणाव कमी होईल.

७)भारतीय प्राचीन संस्कृती चे महत्त्व अबाधीत राहील.

८)आयुर्वेद आणि योग यांचा उपयोग समाजाच्या हितासाठी होईल.

भारतीय ज्ञान प्रणाली भारतीय समाजाला लाभलेला अमूल्य असा ठेवा आहे. आयुर्वेद योग, गणित, खगोलशास्त्र यासारख्या तसेच आध्यात्मिक तत्वज्ञान याविषयी ज्ञानाचा भंडार आपल्या पारंपारिक समाजामध्ये आहे या ज्ञानाचा उपयोग देशालाच नाही तर या जगाला होऊ शकतो आणि अनेक लोकांनी वेगवेगळ्या विषयाचा अभ्यास करून भारतीय ज्ञान परंपरा विकसित केली आहे या ज्ञान परंपरेचा वारसा येणाऱ्या पिढीला उपयुक्त ठरणार आहे.

ज्ञान प्रणाली समाजाच्या शाश्वत विकासावर भर देते. आधुनिक समाजात भौतिक विकासावर भर दिला जात असला तरी तो कायम स्वरूपाचा नाही समाजाचा विकास जर करायचा असेल तर समाजाचा शाश्वत विकास करणे गरजेचे आहे. त्यामुळे भारतीय तत्त्वज्ञानात शाश्वत विकासाचे मार्गदर्शन करण्याचं काम या ज्ञान प्रणाली करणार आहे. भारतीय समाजात अनेक महान व्यक्ती होऊन गेले त्यांच्या माध्यमातून भारतीय ज्ञान परंपरा सक्षम होत गेली या ज्ञानपरंपरेचा उपयोग भविष्यात येणाऱ्या तरुण तरुणी पिढीला झाला पाहिजे यासाठी हे ज्ञान प्रणाली आत्मसात करणे गरजेचे आहे.

**संदर्भ सूची**

1) Kapil Kapoor (2024), Indian Knowledge Systems, Published by D.K



Scanned with CamScanner

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318 | Vidyawarta
Peer-Reviewed International

PRINTWORLD (P) LTD.New Delhi.

2) B. Mahadevan, (2022), Introduction to IKS, Published by Eastern Economic Edition, Delhi.

3) Prof. BC Chauhan,13 March 2023, IKS: The Knowledge system of Bharata, Published by Garuda Prakashan

4) डॉ. शैलेशकुमार वाघ, 2 Sep २०२४, भारतीय ज्ञान प्रणाली, Published by Atharva Publications

5) https://iksindia.org/index.php

6) https://en.wikipedia.org/wiki/Indian_Knowledge_Systems

7)https://secure.mygov.in/campaigns/iks/#:~:text=Indian%20Knowledge%20Systems%20%7C%20MyGov.in

8) https://acc.ac.in/indian-knowledge-system-iks/

9) https://www.education.gov.in/nep/indian-knowledge-systems

❑❑❑

Scanned with CamScanner